**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती आणि राज्यपालांना विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी कालमर्यादा घालून देणं राज्यघटनेच्या विरोधात असल्याची भूमिका सरकारकडून सर्वोच्च न्यायालयात सादर

- राज्याच्या विविध भागात पावसाशी संबंधित दुर्घटनांमध्ये ६ जणांचा मृत्यू, मुंबई, ठाणे, रायगड, पुणे आणि साताऱ्यातल्या घाट परिसरात रेड अलर्ट

- पाकिस्तानमध्ये गेल्या ४८ तासांत अचानक आलेले पूर आणि दरडी कोसळून ३००पेक्षा जास्त जण मृत्युमुखी

- अमेरिका-रशिया यांच्यात युक्रेन युद्धसमाप्तीबाबत सकारात्मक चर्चा, मात्र शस्त्रसंधीची घोषणा नाही

**आणि**

- जेरुसलेम ग्रँडस्लॅम ॲथलेटिक्स अडथळ्यांच्या शर्यतीत ऑलिम्पिकपटू अंकिता ध्यानी हिची सुवर्णपदकाची कमाई

**<><><><>**

राष्ट्रपती आणि राज्यपालांना विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी कालमर्यादा घालून देणं राज्यघटनेच्या विरोधात आहे, असं उत्तर सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयात सादर केलं आहे. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या निकालाबाबत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाला विचारलेल्या प्रश्नांवर सध्या सुनावणी सुरू आहे. कलम २०० आणि २०१ नुसार अशी कालमर्यादा घालता येत नाही, विधेयकांवर निर्णय घेणं हा राष्ट्रपती आणि राज्यपालांचा अधिकार आहे, असं मेहता यांनी आपल्या उत्तरात म्हटलं आहे.

**<><><><>**

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं काल स्वातंत्र्यदिनी देशभरातल्या एक हजार १५० पथकर नाक्यांवर फास्टटॅग वार्षिक पास सुविधा सुरू केली. काल संध्याकाळी सात वाजेपर्यंत एक लाख ४० हजार जणांनी हा पास खरेदी केल्याचं रस्ते वाहतूक आणि महामार्ग

मंत्रालयानं सांगितलं. यात महाराष्ट्रातल्या नाशिक-पेठ, सूरत-दहिसर, सातारा-कागल, पुणे-सोलापूर, खंडाळा-सातारा, सांगली-सोलापूर, पाटस-बारामती, नागपूर-कोंढली, नागपूर-हैदराबाद, अमरावती-चिखली, करोडी-छत्रपती संभाजीनगर, मंठा-परतूर, वर्धा-बुट्टीबोरी इत्यादी ९६ मार्गांवरल्या पथकर नाक्यांचा समावेश आहे. वाहनचालकांना पथकर नाक्यावर पासची सुविधा विनाअडथळा मिळावी यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं प्रत्येक नाक्यावर अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे. एकाच वेळी तीन हजार रुपयांचा हा पास रीचार्ज केल्यानंतर वाहनचालकांना वारंवार पास रीचार्ज करण्याची गरज उरणार नाही. या पासची मुदत एक वर्ष किंवा दोनशे पथकर नाक्यांसाठी असेल. हा पास फक्त खासगी वाहनांसाठी तसंच राष्ट्रीय महामार्ग आणि द्रुतगती मार्गांसाठीच वैध असेल.

**<><><><>**

राज्याच्या अनेक भागात कालपासून सुरू असलेल्या जोरदार पावसानं एकंदर ६ जणांचा मृत्यू झाला आणि २ जण जखमी झाले. मुंबईतल्या विक्रोळीत दरड कोसळून दोघांचा, नांदेड जिल्ह्यात भिंत कोसळून दोघांचा, यवतमाळमध्ये वीज पडून एकाचा आणि वाशिममध्ये नाल्याच्या पुरात वाहून गेल्यानं एकाचा मृत्यू झाला.

आज सकाळी साडे ८ वाजता संपलेल्या २४ तासात सांताक्रूझ वेधशाळेत २४४ मिलिमीटर तर कुलाब्यात ८३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. विक्रोळी, सांताक्रूझ, सायन, जुहू या परिसरांमध्ये २०० मिलीमीटर पेक्षा अधिक पावसांची नोंद झाली. बांद्रा, भायखळा इथं दीडशे मिलीमीटरपेक्षा जास्त पाऊस झाल्याचं हवामान विभागानं कळवलं आहे. सांताक्रूझमध्ये ऑगस्ट महिन्यात एका दिवसात झालेल्या सर्वाधिक पावसाचा हा गेल्या ५ वर्षांतला विक्रम आहे. यापूर्वी ४ ऑगस्ट २०२० रोजी २६८ मिलीमीटर पावसाची नोंद झाली होती.

मुंबई, ठाणे, रायगड आणि पुणे-साताऱ्यातल्या घाट परिसरात आजही मुसळधार पाऊस कायम राहणार असून याठिकाणी रेड अलर्ट देण्यात आला आहे. नाशिक आणि कोल्हापुरातल्या घाट परिसर, रत्नागिरी, परभणी, हिंगोली, नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोलीमध्ये ऑरेंज अलर्ट दिला आहे.

**<><><><>**

पाकिस्तानमध्ये गेल्या ४८ तासांत मुसळधार पावसामुळे अचानक आलेले पूर आणि दरडी कोसळून ३२१ जणांचा मृत्यू झाला आहे. यापैकी ३०७ जण खैबर पख्तुनख्वा प्रांतात मृत्यूमुखी पडले असून पाकव्याप्त काश्मीरमधल्या ९, तर गिलगिट-बाल्टिस्तान प्रांतातल्या ५ जणांचा यात मृत्यू झाला आहे.

**<><><><>**

जम्मू-काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात चसोटी इथं झालेल्या ढगफुटीनंतर मदत आणि बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. आत्तापर्यंत किमान ६० जणांचा मृत्यू झाला असून १०० पेक्षा जास्त जण जखमी झाले आहेत. राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल, लष्कर, पोलीस आणि स्थानिक प्रशासन युद्धपातळीवर मदत आणि बचावकार्य करत आहेत. जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी आज चसोटी गावाला भेट देऊन परिस्थितीचा तसंच मदत आणि बचावकार्याचा आढावा घेतला आणि प्रत्यक्षदर्शींशी संवाद साधला.

**<><><><>**

यशस्वी अंतराळ मोहिमेनंतर भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला उद्या भारतात परतणार आहेत. भारतात परतल्यानंतर आपल्या मूळ गावी लखनौला जाण्यापूर्वी ते प्रधानमंत्री नरेंद्र मोदींना भेटणार आहेत. जून महिन्यात ॲक्झिओम ४ मोहिमेअंतर्गत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पोहोचणारे शुक्ला हे पहिले भारतीय बनले. १८ दिवसांच्या मोहिमेनंतर १५ जुलै रोजी ते पृथ्वीवर परतले.

**<><><><>**

रशियाकडून तेल खरेदी करत असल्यामुळं भारत, चीनवर लादलेल्या अतिरीक्त २५ टक्के शुल्काची आकारणी न करण्याचे संकेत अमेरिकेनं दिले आहेत. याबाबत दोन ते तीन आठवड्यात याबाबत निर्णय घ्यावा लागेल, असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. युक्रेनमधलं युद्ध संपवण्याच्या दिशेनं पावलं उचलली नाहीत, तर रशियावर आणि रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवरही निर्बंध लादण्याचा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे. चीन आणि भारत रशियाच्या तेलाचे अव्वल दोन खरेदीदार आहेत.

**<><><><>**

युक्रेन युद्ध समाप्तीवर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यात काल अलास्का इथं तीन तास चर्चा झाली, मात्र शस्त्रसंधीची घोषणा झाली नाही. या बैठकीनंतर झालेल्या वार्ताहर परिषदेत ट्रम्प यांनी अतिशय सकारात्मक चर्चा झाल्याचं आणि अनेक मुद्द्यांवर सहमती झाल्याचं सांगितलं. दोन्ही देशांमध्ये शांतता प्रस्थापित करण्याच्या मुद्द्यावर आता युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांना निर्णय घ्यायचा आहे, असंही ट्रम्प म्हणाले. ही वाटचाल अशीच सुरू राहिली, तर युक्रेनबरोबरचं युद्ध लवकरच संपेल, असा विश्वास रशियाचे अध्यक्ष पुतीन यांनी व्यक्त केला. युक्रेन आणि युरोपनं चर्चेत खोडा घालू नये, असा इशाराही त्यांनी दिला. युक्रेनमधली परिस्थिती रशियाच्या सुरक्षेसाठी धोकादायक असून संघर्षाकडून संवादाकडे यायची हीच वेळ आहे, असं मत त्यांनी मांडलं. २०२२ मध्ये डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे अध्यक्ष असते, तर युद्ध सुरूच झालं नसतं, असा दावाही पुतीन यांनी केला. ट्रम्प यांच्यासोबतच्या चर्चेची पुढची फेरी मॉस्को इथं व्हावी, असा प्रस्ताव त्यांनी ठेवला.

दरम्यान, शस्त्रसंधीनंतरही युक्रेनच्या सुरक्षेसाठी युक्रेनमध्ये सैन्य ठेवण्याची ब्रिटन आणि मित्र राष्ट्रांची तयारी असल्याचं ब्रिटनचे संरक्षण मंत्री जॉन हिले यांनी सांगितलं. ट्रम्प यांनीही सैन्य ठेवण्याचं सुतोवाच केलं आहे मात्र नाटो अंतर्गत एकत्र येण्याला त्यांचा विरोध आहे.

दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची सोमवारी अमेरिकेत भेट घेणार असल्याची घोषणा युक्रेनचे अध्यक्ष वोलिदिमिर झेलेन्स्की यांनी केली आहे.

**<><><>**

माजी प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांना आदरांजली वाहिली. देशाच्या सर्वांगीण प्रगतीप्रति त्यांचं समर्पण आणि सेवाभाव सर्वांसाठी प्रेरणादायक असल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात नमूद केलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, जे.पी. नड्डा, किरेन रिजीजू, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासह अनेक मान्यवरांनी वाजपेयी यांच्या 'सदैव अटल' या स्मृतिस्थळावर पुष्पांजली अर्पण केली.

**<><><>**

देशभरात सर्वत्र आज कृष्ण जन्माष्टमी आणि गोपाळकाल्याचा उत्साह आहे. यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना शुभेच्छा दिल्या. श्रीकृष्णाने संपूर्ण मानवतेला धर्मानुसार कर्तव्यपथावर चालण्याचा आणि सर्वांच्या हितासाठी काम करायचा मार्ग दाखवला. या मार्गावर चालून समाज आणि देशाला बळकट करूया, असं आवाहन राष्ट्रपती मुर्मू यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात केलं. तर, विश्वास, आनंद आणि उत्साहाचा हा पवित्र सण लोकांच्या जीवनात नवा उत्साह आणि नवी ऊर्जा भरेल, अशी आशा प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात व्यक्त केली.

**<><><><>**

भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त अमेरिकेमधल्या सिऍटल शहरातल्या ६०५ फूट उंच मनोऱ्यावर भारतीय राष्ट्रध्वज फडकवण्यात आला.

**<><><><>**

ऑलिम्पिकपटू अंकिता ध्यानी हिनं जेरुसलेम ग्रँडस्लॅम ॲथलेटिक्स स्पर्धेत महिलांच्या २ हजार मीटर अडथळ्यांच्या शर्यतीत सुवर्णपदक पटकावलं. ६ मिनिटं आणि १३ पूर्णांक ९३ शतांश सेकंद वेळ नोंदवून २३ वर्षांच्या अंकितानं याआधीचा पारुल चौधरीचा राष्ट्रीय विक्रमही मोडीत काढला. या यशामुळे पुढल्या महिन्यात टोकियो इथं होणाऱ्या ३००० मीटर जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी जागतिक मानांकन कोट्यातून पात्र ठरण्याच्या अंकिताच्या आशा वाढल्या आहेत.

**<><><><>**

भारताचा ग्रँडमास्टर एम. प्राणेश यानं क्वांटबॉक्स चेन्नई ग्रँड मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेत चॅलेंजर्स विभागाचं जेतेपद पटकावलं, तर मास्टर्स विभागात विन्सेन्ट कीमर यानं विजेतेपद मिळवलं.

**//<><><><>//**